ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शासकीय धोरणातील राजकीय हस्तक्षेप व सामाजिक पातळीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

**सुभाष अमर सावंत, Ph. D.**

*लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मंडणगड, मु. पो. ता. मंडणगड, जिल्हा रत्नागिरी 415203*

*Scholarly Research Journal's* ***is licensed Based on a work at*** *www.srjis.com*

**प्रस्तावना –**

भारतीय शासन व्यवस्थेवर राजकारणाचा वर चष्मा सातत्याने दिसून आलेला आपणास पहावयास मिळतो आणि तो असणे हे ही साहजिकच आहे. ज्या भारत देशाने लोकशाही व्यवस्था स्विकारतांना मुळातच राजकीय पक्षीय राजकारण हा त्याचा कणा मानला आहे. लोकांच्या प्रतिनिधींच्या माध्यमातूनच आपण आपल्या देशाचा कारभार हाकत आहोत. त्यामुळे ही व्यवस्था लोकांच्या विकासासाठीची व्यवस्था आहे हे राजकर्त्यांनी विसरता कामा नये. असे जरी असले तरी प्रत्यक्ष लोकांचे प्रश्न सोडविण्यापेक्षा आपली सत्ता कशी टिकविता येईल याचाच विचार शासकीय व्यवस्था चालवीत असतांना राजकीय माध्यमातून होतांना दिसून येत आहे.

खऱ्या अर्थाने या लोकशाही माध्यमातून लोकांच्या विकासाला अधिक महत्व देणे गरजेचे होते व आहे. परंतु लोकांसाठी घेत असलेल्या बहुतांश धोरणामागे आपल्या राजकीय कारकिर्दीला त्याचा अधिक फायदा कसा होईल याचा विचार मोठया प्रमाणात होतांना दिसून येतो. आपल्या राजकीय व्यवस्थेला अधिक फायदा व्हावा या दृष्टीने घेत असलेला निर्णय हा बहुतांश वेळा राजकीय फायद्यासाठीच घेतला जातो. त्यानंतर त्याचे समाजावरील तात्पुरते व दीर्घ काळानंतर होणारे परिणाम काय असतील याचा बहुतांश विचार होतांना बघावयास मिळत नाही. परिणामी शासनाने वेळोवेळी घेत असलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे समाजाला अनेक दुष्परिणामाला सामोरे जावे लागत असलेले आपणास पहावयास मिळते.

**संशोधनाचा उद्‌देश –**

शासनाने घेतलेल्या निर्णयामध्ये मोठयाप्रमाणातील असणारा राजकीय हस्तक्षेप व त्यामुळे समाजावरील झालेला परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधनांची गृहीततत्वे –**

1) शासनाच्या बहुतेक धोरणामध्ये राजकीय हस्तक्षेत्र मोठया प्रमाणात होतो.

2) या हस्तक्षेपामुळे समाजावर त्याचे मोठया प्रमणात दुष्परिणाम झालेले दिसून येतात.

**संशोधनातील मर्यादा –**

सर्वच निर्णय हे राजकीय आकांक्षेपोटी घेतले जातात असे नाही. परंतु बहुतांश निर्णय प्रक्रियेमध्ये राजकीय हस्तक्षेत्र दिसून येतो. देश स्वातंत्र्यानंतर असे अनेक निर्णय अथवा विधेयक शासनाने पारित केली. त्या सर्वच धोरणांचा या ठिकांनी वेळे अभावी अभ्यास करणे. संशोधकाला शक्य नसल्याने या ठिकाणी शासनाने घेतलेल्या दोन महत्वपूर्ण धोरणांचा अभ्यास संधोधकाने करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे हरितक्रांशी व अन्न सुरक्षा विधेयक या दोन धोरणांचा अभ्यास या संशोधन कार्यातील वेळेची मर्यादा लक्षात घेता अभ्यासासाठी घेतलेला आहे.

**हरित क्रांती –**

हरित कांतीचा मुख्य उद्‌देश भारताला अन्न धाण्याच्या दृष्टीने सुजलाम सुफलाम करणे होय. जागतिक पातळीवर हरित क्रांतीची सुरूवात विचरात घेता इस्त्राईल देशाने 1950 सालापासून केलेली पहावयास मिळते. याचा अभ्यास करून तसेच देशातील शेती विषयक परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या देशमधील अन्न विषयक परिस्थितीमध्ये सुधार घडवायचे असे ठरविले गेले. यासाठी हरित क्रांतीची काही उद्‌दिष्टये ठरविली गेली. देशातील ज्या भागामध्ये सिंचाची सुविधा आहे त्या भागामध्ये शेतक–यांच्या सहाय्याने शेतीचे उत्पादन वाढविण्याचे ठरले. त्यासाठी विविध बाबींचा स्विकार करण्याचे ठरविले. ज्या ठिकाणी पाण्याची सुविधा आहे त्या ठिकाणी जास्तीत जास्त शेतीला सिंचन निर्माण करून देणे, रासायनिक खतांचा वापर करणे, संकरीत बियाण्याचा वापर करणे, आधुनिक शेती अवजारांचा वापर करणे, बहुपीक पध्दतीचा वापर करणे, यासाठी शेती संशोधनावर भर देणे या सर्व बाबींचा स्विकार करून हरित कांती घडवून आणण्याचे ठरविले गेले. हरित क्रांतीची गरज लक्षात घेता आपला देश हा अन्न धान्याच्या बाबत दुस–या देशांवर अवलंबून होता. त्यामुळे देशाला अन्न धान्याबाबत स्वयंपूर्ण करण्यासाठी हरित क्रांतीची गरज होती. यामुळेच

हरित क्रांतीच्या माध्यमातून देशातील मोठया प्रमाणात अन्नाची होणारी आयात थांबविणे शक्य होणार होते. यासाठी तत्कालीन सरकार व्यवस्थेने आपल्या देशातील अन्नधान्य वाढविण्यासाठी हरित कांतीचे धोरण स्विकारले. परंतु हे धोरण स्विकारत असतांना जे अनेक निर्णय घेण्यात आले त्यामध्ये 1) रासायनिक खतांचा वापर करणे, 2) संकरीत बियाण्यांचा वापर करणे यामुळे देशातील उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. विशेषतः गहू उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याने या हरित क्रांतीला गव्हाची कांती असेही संबांधिले जाते.

**हरित कांती धोरणाचे समजावरोल परिणाम –**

हरित कांतीच्या धोरणामुळे देशातील अन्नधान्य वाढले. परंतु त्यापेक्षाही या निर्णयामुळे देशातील सर्वच शेतकऱ्यांवर मोठया प्रमाणात विपरित परिणाम झालेले दिसून येतात. मोठया प्रमाणात अन्नधान्य पिकविण्याच्या नादात शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात रासायनिक खताचा वापर केला. परिणाम लक्षात घेता खताचा व पाण्याचा अतिरिक्त वापरामुळे अनेक शेतकऱ्यांची शेतजमीन पुढील कालावधीत नापीक झालेली दिसून येत आहे. विषरहीत अन्न आपण आपल्या जनतेला याच धोरणेतून बहाल केलेले दिसून येते. यामुळे आपण अनेक आजारांना निमंत्रण दिले आहे असे तज्ञ डॉक्टरांचे म्हणणे आहे. हरित क्रांतीमधून मोठया प्रमाणात उत्पादित झालेला गहू हा सिधा वाटप यंत्रणेच्या माध्यमातून संपूर्ण देशभर जनतेला वाटप करण्यात आला. यामुळे जनतेने गहू मोठया प्रमाणात वापरण्यास सुरूवात केली. प्रसिध्द कार्डिओलोजिस्ट विल्यम डेव्हिस, एमडी यांनी व्हिट बेली या पुस्तकात गहू खाण्यामुळे आपल्याला हदयविकार, मधुमेह, लठ्ठपणा या शारिरीक समस्या उद्‌भवतात असे मांडले आहे. किंबहुना हे त्यांनी प्रयोगांती सिध्द केले आहे. जेव्हा त्यांच्या रूग्णांनी गहू खाणे बंद केले तेव्हा त्यांचे वनज व पोट मोठया प्रमाणात घटले व रक्तातील साखर कमी झाल्याचे दिसून आले. अशा अनेक आजारापासून अनेक रूग्णांची सुटका झाली. संकरीत बियाण्यांचा वापर वाढल्याने स्थानिक बियाण्यांचा बीमोड झाला. त्या त्या ठिकाणी होणारे उत्पादन हे स्थानिक पातळीवरील महत्वाची व वैशिष्टपूर्ण अशी ही बियानी होती. परंतु हरित कांतीमुळे संकरीत बियाण्यांचा वापर वाढल्यामुळे ही स्थानिक प्रजाती नामशेष झाल्या. गहू आज मोठया प्रमाणात घरोघरी वापरल्या जात आहे. त्यामुळे त्या त्या ठिकाणची अन्नधान्य उदा. कोकणातील नाचणी जवळपास खाण्यातून हद्‌दपार होतांना दिसून येत आहे.

विविध पिकांचे उत्पादन (हजार टनात)

| अ.क. | पिके | 1980—81 | 1990—91 | 2000—01 | 2010—11 | 2013—14 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ज्वारी | 4409 | 5929 | 3988 | 3452 | 2482 |
| 2 | बाजरी | 697 | 1115 | 1087 | 1123 | 788 |
| 3 | तृण धान्ये | 8647 | 10740 | 8497 | 12317 | 11404 |
| 4 | गहू | 886 | 909 | 948 | 2301 | 1602 |
| 5 | तांदूळ | 2315 | 2344 | 1930 | 2691 | 3120 |

महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल 2014—15

हरित क्रांती नंतर महाराष्ट्रातील पिक उत्पादनात झालेला बदल विचारात घेता ज्वारी उत्पादन हे उत्तरोतर घटत गेलेले पहावयास मिळते. बाजरी उत्पादनात सुध्दा अगदी काही शुल्लक प्रमाणात वाढ व घट होत गेलेली दिसून येते. मात्र ज्या प्रमाणात उत्पादनात वाढ होणे गरजेचे होते त्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. तर तांदूळ उत्पादन हे सुध्दा वाढत गेलेले दिसून येते. याचाच अर्थ एका बाजूला गहू उत्पादन मोठया प्रमाणात वाढल्यामुळे त्याचे सिध्दा वाटप पत्रिकेच्या माध्यमातून देशभर केले गेले. त्याचो लोकांना सवयही लागली. मात्र पर्यायाने देशातील स्थानिक उत्पादने त्यामध्ये ज्वारी, बाजरी, नाचणी इ. पिके यांचे उत्पादन घटलेले दिसून येते.

शासन कर्त्यांनी देशाची परिस्थिती लक्षात घेता व जनतेची गरज ओळखून जनतेची सहानुभूती मिळविण्याच्या दृष्टीने हा राजकीय निर्णय घेतलेला दिसून येतो. हा निर्णय घेतांना राज्यकर्त्यांनी दूर दृष्टीचा विचार करणे गरजेचे होते. कदाचित हाच विकास चिरस्थाई स्वरूपाचा करण्यासाठी निर्णय घेणे शासन यंत्रणेला शक्य होते. परंतु त्याचे रिझल्ट हे तात्काळ दिसणारे नव्हते. किंबहुना केलेल्या कामाचे श्रेय हे तत्कालीन सरकारला मिळेल की नाही याची यात्री नसल्याने आपल्याच काळातील हा विकास आहे हे दाखविण्याच्या नादात ही क्रांती घडविली गेली खरी परंतु आज आपणावर ही वेळ येऊ घातली आहे हे आपण समजून घेणे गरजेचे आहे.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयक —**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातील लोकांना सन्मानाने जगता याव यासाठी त्यांना पुरशा प्रमाणात दर्जेदार अन्न परवडणाऱ्या किंमतीत उपलब्ध करून देण्याची खात्री हे या विधेयकाचा उद्देश होता. 1986 च्या जागतिक विकास अहवालानुसार लोकांच्या कार्यक्षम व निरोगी जीवनासाठी सर्व लोकांना सर्व वेळी पुरेशा प्रमाणात खाद्यान्न उपलब्ध करून देणे म्हणजे अन्न सुरक्षा होय. देशातील जनतेचा विचार करता आपल्या देशातील 40 टक्के जनता ही दारिद्रय रेषेखाली आहे. या जनतेतील बहुतांश जनतेला पुरेशे खाद्यान्न मिळतांना

दिसून येत नाही ही परिस्थिती आहे. किंबहुना दारिद्रय रेषेच्या जवळपास असणाऱ्या जनतेचे प्रमाणही आपल्या देशात मोठया प्रमाणात आहे. या जनतेचाही विचार या विधेयकाच्या माध्यमातून होऊ शकेल. तसेच आपल्या देशातील कुपोषणाचे प्रमाणही मोठया प्रमाणात दिसून येते. या कुपोषित जनतेला सुध्दा या विधेयकाचा मोठा आधार मिळू शकेल यात शंका नाही.

**विधेयकातील तरतुदी –**

या विधेयकाचा फायदा हा विशेषता दारिद्रय रेषेखालील असणाऱ्या कुटूंबाला वरदान ठरणारा होता. महिन्याकाठी पर मानसी 5 किलो धान्य या प्रमाणात कुटूंबाला 35 किलो धान्य देण्याचे ठरले गेले. यामध्ये तांदूळ 3 रू. व गहू 2 रू. व भरड धान्य 1 रू. प्रति किलो दराने पुरवठा करायचे ठरले. गर्भवती महिलेला तिच्या काळात तसेच नंतरच्या पुढील सहा महिन्यांपयतच्या काळात मोफत पोषण आहार देण्याचे ठरले. सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील सर्व मुलांना अंगणवाडीतून मोफत जेवण द्यायचे ठरविले. सहा वर्षे ते चौदा वर्षे वयोगटातील म्हणजे पहिली ते आठवी इयत्ता पर्यंतच्या सर्व मुलांना एक वेळचे मध्यान जेवण देण्याचे ठरले.

**विधेयकाचे दुष्परिणाम –**

असे जरी असले तरी हे विधेयक ज्यावेळी मंजूर करण्यात आले त्यावेळी त्यामध्ये राजकीय हस्तक्षेत्र मोठया प्रमाणात होता. एका बाजूला आपल्या देशात अन्नधान्य मोठया प्रमाणात पिकलेले होते. एकाधिकार योजनेतून अन्नधान्य सरकारने खरेदी करणे ही सरकारची जबाबदारी होती. परंतु सरकारकडे खरेदी केलेले अन्नधान्य ठेवण्यासाठी पुरेशी कोठारे नव्हती. त्यावेळी सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयातून भात खरेदीसाठी मोठया प्रमाणात आदोलनेही झालेली हाती. परंतु शासनाने आमच्याकडे हे भात ठेवण्यासाठी कोठारे नाही हे कारण पुढे केले होते. यासाठीच उपलब्ध असलेल्या या अन्नाचे काय करावयाचे यातूनच या विधेयकाचा जन्म झाला हे आपणास सांगता येईल. पुरेश अन्न याबाबत विचार करता आपण फक्त गहू व तांदूळ या अन्नाबाबत सुरक्षा देऊ केली आहे. या दोन्ही उत्पादनाबाबत विचार करता हे अन्नधान्य आपल्या देशात मोठया प्रमाणात उत्पादित झाल्यामुळे हे अन्नधान्य जनतेला कमी किंमतीत देणे शासन व्यवस्थेला परवडण्यासारखे होते. या विधेयकाच्या माध्यमातून गहू व तांदूळ कमी किंमतीमध्ये म्हणजेच 3 रू. किला तांदूळ व गहू 2 रू. किलो यानुसार मोठया प्रमाणात वाटण्यात आले. यामुळे दारिद्रय रेषेखालील जी जनता रोजगारावर

आपला उदरनिर्वाह करत होती त्या जनतेचे कष्ट मोठया प्रमाणात कमी झाले. कारण त्यांना 100 रूपयाच्या आतील किंमतीमध्ये 35 किलो धान्य मिळू लागले. पर्यायाने त्यांनी शेती रोजगाराकडे पाठ फिरविलेली दिसून येते. त्यामुळे शेतक—यांना शेतीसाठी मजुरांची कमतरता मोठया प्रमाणात पडलेलो दिसून येते आदीच कोकणसारख्या प्रदेशातून शहरी स्थलांतरण वाढल्यामुळे शेती ही पडीक पडत चालेली होती. त्यात या कारणामुळे मजुरांची कमतरता निर्माण झाल्यामुळे ब-याच लोकांनी शेतकडे मजूरा अभावी पाठ फिरविलेली दिसून येते. त्यामुळे त्यांना मजूरीच्या स्वरूपात मिळणा-या पैशाची आवक सुध्दा कमी झाली त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम बाजारपेठेवर सुध्दा झालेला दिसून येतो. महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल 2014—15 नुसार 2013—14 साली महाराष्ट्रातील वहितीखालील क्षेत्र 19767 (हजार हेक्टरी) इतके होते. सन 2014—15 मध्ये हे क्षेत्र 16343 (हजार हेक्टरी) इतके झाले. म्हणजेच वहितीखालील ख्क्षेत्रात 2014—15 या वर्षात घट झालेली दिसून येते.

थोडक्यात या दोन्ही विधेयकाचा अभ्यास करता या विधेयाकामुळे जेवढया मोठया प्रमाणात फायदा झालेला दिसून येतो तेवढयाच मोठया प्रमाणात त्यांचे दुष्पपरिणाम विविध माध्यमातून शेतक—यांना, अर्थव्यवस्थेला पर्यायाने देशाला सुध्दा सहन करावे लागलेले दिसून येतात.